# सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सिंधुदुर्ग

प्रधान कार्यालय, सिंधुदुर्गनगरी

फोन नं. ०२३६२- २२९००५ ते २२९०१० ई मेल - sindhudurgdcc@gmail.com

**विषय :- बॅंकेच्या लोकल ATM बाबत.**

बँकेने पहिल्या टप्यात १० ठिकाणी ATM सेंटर सुरू सुरू केलेली आहेत. बँकेने पहिल्या टप्यात आपल्याच बँकेच्या ATM सेंटरमध्ये चालणारे कार्ड वितरीत केलेले असून, CBS द्वारे जोडलेल्या कोणत्याही शाखेतील खातेदाराला याद्वारे पैसे काढता येणार आहेत. उदा. माणगांव शाखेतील खातेदारास ATM कार्ड दिल्यास तो कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी इ. ठिकाणी असलेल्या आपल्या बँकेच्या कोणत्याही ATM सेंटरमधून पैसे काढू शकतो. त्यामुळे ज्या शाखांकडे ATM सेंटर नाही. परंतू, शाखा CBS ला जोडलेल्या आहेत ते ग्राहकही ATM कार्ड वापरू शकतात.

१. बँक जिल्ह्याबाहेरून येथून ATM कार्ड प्रिंटींग व त्याबाबतची स्टेशनरी घेते. तसेच प्रिंटींगला एकावेळी किमान ५०० कार्ड दयावी लागतात. त्यामुळे अर्ज आल्यानंतर किमान १० ते १५ दिवसांनी कार्ड उपलब्ध होणार आहेत.

२. ATM कार्ड देणेपूर्वी ग्राहकाकडून अर्ज भरून घेणे बंधनकारक आहे. तसेच त्यामध्ये मोबाईल नंबर नमूद असावा. म्हणजे त्याद्वारे ग्राहकांना SMS Alert ही सुविधा उपलब्ध करून देता येईल.

३. सद्यस्थितीत ATM वापरासाठी येणाऱ्या ग्राहकांना 'सद्या वितरीत करण्यात आलेली ATM कार्ड ही सिंधुदुर्ग बँकेच्याच ATM सेंटरमध्ये वापरता येणार आहेत

## Local ATM Card

बँकेच्या स्वतःच्या शाखांमध्ये वापरले जाणारे Local ATM Card सदर कार्ड धारकाला कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही. बँकेच्या कोणत्याही शाखेचा ग्राहक बँकेच्या अन्य शाखांमधून पैसे काढू शकतील.

